# काँग्रेस पक्षाच्या वाढीसाठी आता निष्ठावंतांची 'न्याय संघर्ष यात्रा' : आबा बागुल

## काँग्रेस भवनमध्ये हजारो मेणबत्त्या प्रज्ज्वलित करून निष्ठावंतांचे 'मूक आंदोलन'



**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

आगामी काळात काँग्रेसच्या कोणत्याही निष्ठावंतांवर अन्याय होऊ नये आणि पक्षपातळीवर त्याची गंभीरतेने दखल घेतली जावी, या उद्देशाने आता निष्ठावंतांची न्याय संघर्ष यात्रा काढणार आहोत. त्यातून निष्ठावंतांची भावना सातत्याने पक्षाच्या श्रेष्ठींपुढे पोहोचवणार आहोत. पुण्यातून सुरू होणाऱ्या या निष्ठावंतांच्या न्याय संघर्ष यात्रेचे स्वरूप आगामी काळात शहर पातळीवरून राज्यच काय देशपातळीवर वाढेल. ज्यातून काँग्रेस पक्षाच्या वाढीसाठी एकजूट निश्चितच होईल, अशी भूमिका काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते व माजी उपमहापौर आबा बागुल यांनी मांडली. शिवाय जातीयवादी शक्तींना रोखण्यासाठी काँग्रेसला निष्ठावंतांची गरज आहे, ती एकजूट या निष्ठावंतांची न्याय संघर्ष यात्रेतून होणार आहे.

पुणे लोकसभा निवडणुकीत पक्षाच्या निष्ठावंतांना विचारात न घेता सातत्याने डावलण्याचे होणारे राजकारण कुठेतरी थांबले पाहिजे. काँग्रेस पक्ष वाढला पाहिजे आणि पक्षातील प्रत्येक निष्ठावंतांना संधी मिळालीच पाहिजे यासाठी माजी उपमहापौर आबा बागुल यांनी काँग्रेसच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांसमवेत काँग्रेस भवन येथे राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या पुतळ्याजवळ नतमस्तक होऊन हजारो मेणबत्या प्रज्वलित करून मूक आंदोलन केले. त्यानंतर निष्ठावंतांच्या न्याय संघर्ष यात्रेचा शुभारंभ पुण्यातून झाला असून त्याची जबाबदारी मी स्वीकारली आहे. असेही त्यांनी जाहीर केले.

आबा बागुल यांनी म्हटले आहे की, शहर काय राज्यपातळीवर काँग्रेसच्या निष्ठावंतांना सातत्याने डावलले जाते.त्यांची जबाबदारी कुणीतरी घेतली पाहिजे. 'आयाराम -गयारामा 'साठी होणाऱ्या राजकारणात निष्ठावंतच भरडला जातो. पक्षाशी एकनिष्ठ राहून कार्य करणाऱ्या या निष्ठवंतांच्या व्यथेची दखल घेतली जावी आणि त्यांना पक्षात संधी मिळालीच पाहिजे. तसेच पक्षाच्या निष्ठावंतांना मानसन्मानाने बोलावून त्यांची विचारपूस करून त्यांच्या भावना आणि जिथे कुठे निष्ठावंतांवर अन्याय होईल तिथे त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांच्यावर होणारा अन्याय पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राष्ट्रीय नेते राहुल गांधी, प्रदेशच्या सर्व नेत्यांसमोर प्रत्यक्ष भेट घेऊन मांडला जाईल. जेणेकरून पक्ष वाढीला चालना मिळाली पाहिजे हा हेतू या निष्ठावंतांची न्याय संघर्ष यात्रेचा असून आता निष्ठेची ज्योत पेटल्याशिवाय राहणार नाही. हेही त्यांनी स्पष्ट केले.

पक्षाचे काही 'नतद्रष्ट' पक्षाचे नुकसान करत आहेत. पुण्यातील पर्वती विधानसभा मतदारसंघ गेली १५ वर्षे भाजपला पोषक करण्याचे कारस्थान या 'नतद्रष्टां'नी केले आहे. वास्तविक तीन वेळा या मतदारसंघातही निष्ठावंतांवर अन्याय झालेला आहे. या 'नतद्रष्टां'नी काँग्रेसला पोषक असणारा हा मतदारसंघ जाणीवपूर्वक भाजपला कसा फायद्याचा ठरेल यासाठीच हातभार लावलेला आहे. त्यामुळे पक्ष वाढीसाठी अडथळा ठरणाऱ्यांना आताच शोधून काढले पाहिजे. नाहीतर काँग्रेस पक्ष वाढीला हा मोठा अडथळा राहील. यंदाच्या निवडणुकीवर या निष्ठावंतांची न्याय संघर्ष यात्रेचा कोणताही परिणाम होणार नाही. आम्ही पक्षाशी एकनिष्ठ आहोत.आमचे कार्य सुरूच राहणार आहे . मीच म्हणजे काँग्रेस अशा अविर्भावात असणाऱ्या आणि नेत्यांचे कान भरवणाऱ्या या 'नतद्रष्टां'ना आता बाजूला केले पाहिजे. आपल्याला जातीयवादी शक्तीला रोखायचे आहे. चारशे पार काय दोनशे पार होऊ देणार नाही असा निर्धार निष्ठावंतांनी केल्याचे आबा बागुल यांनी सांगितले.

यावेळी माजी मंत्री श्री बाळासाहेब शिवरकर, पर्वती मतदार संघाचे निरीक्षक मुख्तार शेख, सरचिटणीस संतोष गेले, काँग्रेस पदाधिकारी गोरख मरल, तिळवण तेली समाज पुणे शहर अध्यक्ष घनशाम वलुंजकर, भीमज्योत संघटनेचे अध्यक्ष गजानन किरते, मुस्लिम यंग सर्कल चे महमद शेख, ज्येष्ठ नागरिक संघाचे दीपक कूडले निष्ठवंत कार्यकर्ते व पुणेकर मोठ्या संखने उपस्थित होते.

### 'मीच म्हणजे काँग्रेस पक्षालाच आक्षेप, मग तुम्हीच उमेदवार कसा निवडून आणणार?

**शहर काँग्रेसच्या एका नेत्याच्या 'मीच म्हणजे काँग्रेस पक्ष आणि मीच खासदारकीचे तिकीट बसवले' या वक्तव्याचे तीव्र पडसाद काँग्रेसच्या वर्तुळात उमटले आहेत. तुम्हीच म्हणजे 'काँग्रेस पक्ष' असाल तर कार्यकर्त्यांनी काय करायचे? असा सवाल करताना ज्यांना काँग्रेस कुणाची, परंपरा काय हेच माहित नाही. अशा या नेत्याला इतका अहंमपणा आला कुठून, अशी संतप्त प्रतिक्रिया निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये उमटली आहे. तुम्हीच म्हणजे काँग्रेस पक्ष असेल तर मग आता लोकसभेचा उमेदवार तुम्ही विना कार्यकर्ते कसा निवडून आणणार, असा प्रश्नही काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केला आहे.**

# नागरिकांच्या कानठळ्या बसविणाऱ्या बुलेट दुचाकींवर सातारा पोलिसांची कारवाई

## ८ वाहने, ५६ सायलेन्सर, १० सायरन जप्त



**राजदंड / सातारा :**

सातारा शहर वाहतूक शाखेच्या पथकाने सातारा शहरासह परिसरात सायलेन्सर आणि हॉर्नमध्ये बदल करत सर्वसामान्यांच्या कानठळ्या बसविणाऱ्या बुलेट दुचाकींवर कारवाईचा सपाटा लावला आहे. याप्रकरणी शाहूपुरी पोलिस ठाण्यात आठ जणांवर गुन्हा नोंदवत बुलेट जप्त करण्यात आल्या आहेत.

गुन्हा दाखल झालेल्यांमध्ये स्वप्नील रामचंद्र भोसले (रा. श्री व सौ अपार्टमेंट, पोवई नाका), ओमकार संजय हाके (रा. धनगरवाडी, कोडोली), अनिरुद्ध जयराज देवदारे (रा. गुरुवार पेठ), महेश दिनकर कांबळे (रा. गोलमारुतीजवळ, यादोगोपाळ पेठ), सिद्धांत संतोष माने (रा. रविवार पेठ), प्रथमेश विजयकुमार पुणेकर (रा. सोमवार पेठ) यांच्यासह दोन अनोळखी बुलेट चालकांचा समावेश आहे.

शनिवारी दिवसभरात कारवाई करत वाहतूक शाखेने ५६ मॉडीफाय सायलेन्सर, तसेच दहा सायरन असे पाच लाखांचे साहित्य वाहतूक शाखेने जप्त केले.

सातारा शहरात गेल्या काही दिवसांपासून बुलेटराजांनी धुमाकूळ घातला होता. सायलेन्सर आणि हॉर्नमध्ये बदल करत हे बुलेटराजा फटाके फोडल्याचा आवाज करत वर्दळीच्या रस्त्यावरून वेगात जात असत. यामुळे सर्वसामान्य पादचाऱ्यांसह इतर वाहनधारकांच्या कानठळ्या बसत असत. या बुलेटराजांवर कारवाई करण्याची मागणी साताऱ्यातील नागरिकांकडून होत होती. यानुसार गेल्या दोन दिवसांपासून वाहतूक शाखेने अशा बुलेट व इतर वाहनांवर कारवाई करण्याची मोहीम उघडली आहे.

कारवाईदरम्यान मोती चौक, गोलबाग, गिते बिल्डिंगसह इतर भागात रात्रीच्या वेळी बुलेट, यामाहासह इतर वाहनांची तपासणी करण्यात आली. तपासणीत बुलेटच्या ठेवणीत बदल केल्याचे आढळले. यानुसार याप्रकरणी संबंधित बुलेटचालक, मालकांवर शाहूपुरी, तसेच सातारा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला.

# डॉ. विठ्ठल बापूजी ठोंबरे अस्सल मातीतील साहित्यिक - प्रा. कोकरे

■ दुधेबावीत स्वर्गीय डॉ. विठ्ठल बापूजी ठोंबरे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन संपन्न



**राजदंड / फलटण**

मराठी साहित्यात कुलदैवत खंडोबाचे संशोधन करून आपले नाव सातासमुद्रापलीकडे अजरामर करणारे दुधेबावीचे डॉ. विठ्ठल बापूजी ठोंबरे हे खरे अस्सल मातीतील साहित्यिक होते. त्यांच्या साहित्यातून लोकसंस्कृती, लोकसाहित्य, लोककला यांचं पदोपदी दर्शन घडते. जनसामान्याच्या काळजाचा ठाव घेणारे साहित्यिक म्हणून त्यांची साहित्यक्षेत्रात ओळख आहे. त्यांच्या नावाने अभ्यासिका, समृद्ध ग्रंथालयाबरोबर साहित्यिकांना प्रेरणा देणारे कार्यक्रम होणार आहेत, असे प्रतिपादन ग्रामीण कथाकार संमेलनाध्यक्ष प्रा. रवींद्र कोकरे यांनी व्यक्त केले.

पहिल्या राज्यस्तरीय स्वर्गीय डॉ. विठ्ठल बापूजी ठोंबरे ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या विचार पिठावरून कोकरे बोलत होते. संमेलन उद्घाटक ज्येष्ठ साहित्यिक मारोतराव वाघमोडे यांनी ठोंबरे यांचा जीवनप्रवास उलगडला. प्रमुख अतिथी रघुराज मेटकरी बा. ग. केसकर, हभप आप्पा निकम उपस्थित होते. साहित्यिक विठ्ठल ठोंबरे यांच्या साहित्यकृतीचे पूजन व वृक्षरोपणाने संमेलनास सुरुवात झाली.

यावेळी परिसंवाद संपन्न झाला. यामध्ये राजेंद्र बरकडे, हरिभाऊ कोळेकर, शशिकांत सोनवलकर, प्रकाश सस्ते, राजेंद्र आगवणे, आधिका माने, अंकुश शिंदे, आशा दळवी या साहित्यिकांनी स्वर्गीय विठ्ठल ठोंबरे यांच्या साहित्यिक योगदानाबद्दल गौरवोद्गार काढले.

कवी संमेलन ज्येष्ठ साहित्यिक रघुराज मेटकरी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यामध्ये कवी धनंजय सोनलकर, डॉ. गोविंद काळे, हनुमंत चांदगुडे, पोपट वाबळे, बाबासाहेब कोकरे, दामिनी ठिगळे, युवराज खलाटे, अविनाश चव्हाण यांनी शेती-माती- नाती-संस्कृती यावरील काव्य सादर करून रसिकांची वाहवा मिळवली.

या संमेलनाचा समरोप हणमंत सोनवलकर, विलास पडवळ, नारायण राव वळकुंदे, कुमार रुपनवर, दत्तात्रय काळे, नूतन भैया तावरे, गणेश गवळी, ताराचंद आगवणे, शिवमूर्ती लोखंडे, महेंद्र पिंगळे, मोहन डांगे, ढोणे गुरुजी यांच्या वैचारिक मार्गदर्शनाने झाला. यावेळी महाराष्ट्रातील साहित्यप्रेमी बहुसंख्येने उपस्थित होते.

संमेलन यशस्वी करण्यासाठी दादा झंजे, प्रकाश कोळपे, बाळकृष्ण दडस, सोमनाथ लोखंडे यांनी संमेलन संयोजन व विशेष सहकार्य केले.

# पुणे लोकसभेसाठी 'लोकसेना'कडून असलम बागवान



**राजदंड / पुणे**

'लोकसेना' हा पक्ष लोकसभा निवडणुकीसाठी राज्याच्या ४८ जागेपैकी दहा जागांवर उमेदवार निवडणूक मैदानात उतरवणार आहे. पुणे लोकसभा मतदारसंघातून सामाजिक कार्यकर्ते आणि इनक्रेडीबल समाजसेवक ग्रुपचे संस्थापक असलम इसाक बागवान यांना उमेदवारी घोषित करण्यात आलेली आहे, अशी माहिती लोकसेना प्रमुख ॲड. प्रा. इलियास इनामदार (बीड) यांनी रविवारी पुण्यात पत्रकाद्वारे दिली.

असलम बागवान हे काँग्रेसचे जुने कार्यकर्ते असून इनक्रेडीबल समाजसेवक ग्रुपच्या माध्यमातुन पुण्यात सामाजिक क्षेत्रात सक्रिय आहेत.त्यांनी अनेक सामाजिक आंदोलन केलेली आहेत. धोरणात्मक मुद्यांवर कार्य ,सी ए ए विरूद्ध पुर्ण भारत दौरा ,पंचायत राज करीता १२०० किमी पोचमपल्ली तेलंगणा ते वर्धा पदयात्रा, पुणे ते मुंबई ३ वेळा सी एए, मुस्लिम आरक्षण, किसान कायदे विरूद्ध पदयात्रा,मौलिक आधिकार करीता पुणे ते दिल्ली सायकल यात्रा अशा अनेक सामाजिक आंदोलनात त्यांचे योगदान आहे.कोंढवा भागातील नागरी प्रश्नांसाठीही त्यांनी लढे दिलेले आहेत.

त्यांचे सामाजिक कार्य पाहून लोकसेनाने त्यांना पुणे येथून उमेदवारी दिली आहे व उर्वरित मतदार संघातील उमेदवारांच्या नावाची घोषणा लवकरच करणार आहोत,अशी माहिती लोकसेना प्रमुख ॲड. प्रा. इलियास इनामदार यांनी दिली आहे.

# पुण्याच्या गांधी भवनमध्ये 'रोजा इफ्तार'चे २७ मार्च रोजी आयोजन

**राजदंड / पुणे**

महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, युवक क्रांती दल या संघटनांच्या वतीने बुधवार, दि.२७ मार्च २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता गांधीभवन, कोथरूड येथे 'रोजा इफ्तार' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'निर्भय बनो आंदोलन' चे ॲड. असीम सरोदे, रिपब्लिकन युवा मोर्चाचे अध्यक्ष राहुल डंबाळे, रिजनल ख्रिश्चन सोसायटीचे लुकस केदारी, इस्लाही सोशल मीडिया फाउंडेशन चे अध्यक्ष पैगंबर शेख, पँथर आर्मी स्वराज्य क्रांती सेनेचे अध्यक्ष फिरोज मुल्ला हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी ,सचिव संदीप बर्वे, विश्वस्त अन्वर राजन हे देखील उपस्थित राहणार आहेत. युवक क्रांती दलाचे कार्यवाह जांबुवंत मनोहर, संघटक अप्पा अनारसे, पुणे शहराध्यक्ष मुस्कान परवीन बाबासाहेब, सुदर्शन चखाले यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी गांधी भवन मध्ये रोजा इफ्तार कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हिंदू-मुस्लिम ऐक्य, सर्वांना रोजगार आणि जातीनिर्मूलन हे गांधीजींनी सांगितलेले भारतीय राष्ट्रवादाचे तीन आधार आहेत. एकमेकांच्या धर्माचा आदर करणे आणि एकमेकांच्या सण-उत्सवात आनंदाने सहभागी होणे, हे भारतीय धर्मनिरपेक्षतेचे सौंदर्य आहे. दिवाळी, रमजान ईद आणि नाताळ हे त्यासंदर्भातले तीन प्रमुख सण आहेत, ज्यात प्रत्येक भारतीयाने सहभाग घेतला पाहीजे. राष्ट्राची एकता आणि एकात्मता याचे आश्वासन देणारी बंधूता निर्माण करण्याचा संकल्प भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेमध्ये नमूद करण्यात आला आहे. त्या संकल्पाप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या या रोजा इफ्तार कार्यक्रमात दरवर्षीप्रमाणे सहभागी व्हावे,असे आवाहन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात रोजा म्हणजे दिवसभराचा उपवास सोडण्यासाठी मुस्लिम बंधू-भगिनी गांधी भवनमध्ये सायंकाळी ६ वाजता येतील. त्यांच्या सेवेसाठी सर्वधर्मीय कार्यकर्ते दुपारी ४ वाजता गांधी भवन मध्ये एकत्र येवून पुर्वतयारी करतील. ज्यांना या सेवाकार्यात सहभागी व्हायचे असेल, त्यांनी दुपारी ४ वाजता गांधी भवनला यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

आज देशामध्ये हिंदू-मुस्लिम ऐक्य तोडण्यासाठी काही राजकीय शक्ती अफवा, गैरसमज आणि असत्य पसरवत आहेत. त्याला बळी पडलेले लोक ठिकठिकाणी हिंसाचार करीत आहेत. या गंभीर वास्तवाचे भान ठेवून आपल्याला राष्ट्रीय एकात्मतेचे मूल्य बळकट करायचे आहे. म्हणून अधिक उत्साह आणि जोमाने या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दल च्या वतीने करण्यात आले आहे.

# शिवजयंतीनिमित्त वडगावात विविध कार्यक्रमांचे आयोजन

**राजदंड / वडगाव मावळ**

येथील शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने २५ ते २८ मार्च दरम्यान राजे शिवछत्रपती जयंती सोहळा साजरा होणारा आहे.या चार दिवसांत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आली असल्याची माहिती राजे शिवछत्रपती समितीचे संस्थापक अध्यक्ष भास्करराव म्हाळसकर, अध्यक्ष अनंता कुडे, कार्याध्यक्ष खंडूशेठ भिलारे, कार्यक्रम प्रमुख आशिष ढोरे व दिलीप चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोमवार दि २५ रोजी सकाळी ९ वाजता शिवप्रतिमेचे पूजन व त्यानंतर जय बजरंग तालीम मंडळाच्या संयोजनाने दगडी गोटी उचलण्याचा शिवकालीन मर्दानी खेळ होईल. (ता. २६) सायंकाळी ४ वाजता महिलांसाठी 'खेळ-खेळूया पैठणीचा' हा स्पर्धात्मक कार्यक्रम होईल. विजेत्या प्रथम तीन क्रमांकांना अनुक्रमे मानाची पैठणी, सोन्याची नथ व चांदीचा छल्ला अशी पारितोषिके दिली जातील.



### दि. २५ ते २८ मार्चदरम्यान 'राजे शिवछत्रपती जयंती सोहळा' साजरा होणार

बुधवार (ता.२७) सायंकाळी ७ वाजता शाहीर आविष्कार देशिंगे (सांगली) यांचा पोवाड्यांचा कार्यक्रम होईल. गुरुवारी (ता.२८) सकाळी ७ वाजता अध्यक्ष अनंता कुडे यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन, पोटोबा महाराज मंदिरात सहजयोग केंद्राच्या सहभागाने शिवजन्मोत्सव साजरा होईल.

विविध किल्ल्यावरून आलेल्या शिवज्योतींचे लायन्स क्लबच्यावतीने स्वागत करण्यात येईल. सायंकाळी ७ वाजता स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ सोहळा होईल. अध्यक्षस्थानी माजी मंत्री बाळा भेगडे असतील. रतनबाई बाफना (राजमाता जिजाऊ पुरस्कार), पांडुरंग महाराज गायकवाड (सांप्रदायिक भूषण पुरस्कार), पत्रकार ज्ञानेश्वर वाघमारे (कर्तव्यदक्ष पुरस्कार), मारुतराव दळवी (कृषिनिष्ठ पुरस्कार), संतोष भिलारे (युवा उद्योग रत्न पुरस्कार) व राजू माडगी यांचा सत्कार करण्यात येणार आहे. रात्री नऊ वाजता रायबा हे छत्रपतींच्या जीवनावरील ऐतिहासिक नाटक होईल. शिवजयंती महोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष भास्करराव म्हाळसकर यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष अनंता कुडे, खंडूशेठ भिलारे, अतिश ढोरे, दिलीप चव्हाण, महेंद्र म्हाळसकर, संतोष भालेराव, सागर मराठे, अनिल ओव्हाळ, अतुल म्हाळसकर, गणेश भिलारे, गणेश गवारे, कुलदीप ढोरे, समीर गुरव, विकी म्हाळसकर, गणेश वहिले आदींनी संयोजन केले आहे.

## विजेचा धक्का लागून मृत पावलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना

# महावितरण कंपनीकडून चार लाखांची नुकसान भरपाई

**राजदंड / वडगाव मावळ**

शिरगाव येथे विजेचा धक्का लागून एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. दीड वर्षानंतर महावितरणकडून मयत शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना चार लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्यात आली. मयत शेतकऱ्याच्या कुटुंबीयांनी महावितरणकडे पाठपुरावा केला मात्र त्यांना महावितरणकडून प्रतिसाद मिळाला नाही.आमदार सुनील शेळके यांनी आमसभेत मयत शेतकऱ्याला मदत करण्याची मागणी केली असता महावितरणने याची तात्काळ दखल घेत नुकसानभरपाई जमा केली आहे.

बुधवार १७ ऑगस्ट २०२२ रोजी शिरगाव येथे राहणारे राजाराम वामन गोपाळे (वय ६५) हे संध्याकाळी सहाच्या सुमारास शेतात फेरफटका मारण्यासाठी गेले असता महावितरणच्या तुटलेल्या तारांचा स्पर्श त्यांच्या पायाला झाला. व जोरात विजेचा धक्का बसून ते खाली कोसळले. शेतातून बराच वेळ घरी न परतल्याने त्यांच्या पत्नी सुमन या शेतात शोधण्यास गेल्या असता त्यांना ते चिखलात पडल्याचे दिसले.

त्यामुळे जवळ जाऊन त्यांना उठवण्याचा प्रयत्न केला असता सुमन यांना देखील विजेचा धक्का बसला व त्या जोरात ओरडल्या.हा आवाज ऐकून बाजूला असलेले बापू गोपाळे धावून आले व त्यांच्या लक्षात आले की दोघांनाही विजेचा धक्का बसला आहे.त्यामुळे त्यांनी हातात बूट घालून सुमन यांना बाजूला केले.बेशुद्ध अवस्थेत असलेले राजाराम गोपाळे यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.